**<u>नि. क्र. ४६ च्या आदेशावरुन वादीतर्फे साक्षीदार क्र. २.</u>**

**<u>मी शपथेवर कथन करतो की,</u>**

**नाव** — अमीर अब्दुल लतीफ.

**वय** - ४५ वर्ष, **व्यवसाय** - बॉड रायटर,

**राहणार**.– रवळनाथ कॉलनी, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**<u>वादीतर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.</u>**

**१.** मी दस्तलेखनाचे काम करत असून माझा भाऊ समीर मुद्रांक विक्रीचा व्यवसाय करतो. आमचे वडिल देखील बॉड रायटरचे काम करतात. आम्ही सर्व एकत्रीत व्यवसाय करतो. मी सन २००४ पासून बॉड रायटरचे काम करत आहे. मी संगणकावरती दस्तलेखन करतो.

**२**. दि.१०.१०.२००६ रोजी दिनकर शिवणे व एकनाथ घोरपडे माझ्याकडे उत्तूर गावातील मिळकतीचा खरेदीपत्राचा दस्त लिहिण्यासाठी माझ्या आजरा येथील कार्यालयात आले होते. मी त्यांच्याकडून माहिती घेतल्यानंतर त्यांना स्टँप आणायला सांगितला होता. त्यांनी ४,४००/– रुपयांचा स्टँप माझ्या भावाकडून खरेदी केला होता. त्यानंतर मी त्यांच्याकडून घेतलेल्या माहिती प्रमाणे स्टँपवरती टंकलेखन केले होते. मला एकनाथ घोरपडेने माहिती दिली होती.

**३**. मी सदर दस्त टंकलिखित केल्यानंतर त्या दोघांना वाचून दाखवला होता. त्यांनी तो बरोबर असल्याचे कबूल केल्यानंतर त्यावरती घेणार व देणार म्हणून स्वाक्ष–या केल्या होत्या. त्यांच्यासोबत असलेले साक्षीदार प्रकाश हरमळकर व दिलीप मस्कर यांनी त्या दस्तावरती साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केली होती. मी त्यांना ओळखतो. मी सदर दस्त तयार केल्याबाबत त्यावरती इंग्रजीमध्ये माझी स्वाक्षरी केली आहे.

**४**. दस्त लिहून झाल्यानंतर त्यांनी तो नोंदवण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात नेला होता. त्यावेळी उत्तूर गावातील जमिनी आंबेओहोळ प्रकल्पासाठी संपादित करण्याची प्रक्रिया चालू होती. त्यामुळे खरेदी–विक्री दस्तासाठी विक्री करणा–या

व्यक्तीचे शपथपत्र घ्यावे लागत होते. त्यामुळे या प्रकरणात लिहून देणार एकनाथ घोरपडे याचे शपथपत्र घेतले होते. मी त्याचे शपथपत्र टंकलिखित केले होते.

**५**. मला दि.१०.१०.२००६ रोजीचा खरेदी–विक्रीचा मूळ दस्त दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला तो दस्त दाखविला, तो मी टंकलिखीत केलेला असून त्यावरती दस्तूर म्हणून माझी स्वाक्षरी आहे. मी त्यावरील सर्वांच्या स्वाक्ष–या ओळखतो, त्याला **नि. क्र.५३** देण्यात येतो. त्या दस्तातील मजकूर बरोबर आहे.
**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.२ तर्फे उलटतपास – श्री. ए. डी. आजगेकर वकील.</u>**

**६.** माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी सन २००४ पासून दस्तलेखनाचा वैयक्तिक व्यवसाय करतो. दस्त लिहिणे व मुद्रांक विक्री करणे हे दोन वेगवेगळे व्यवसाय आहेत. माझ्याकडे दस्त लिहिण्याचा शासनमान्य परवाना नाही. हे म्हणणे खरे नाही की, नोंदणीकृत दस्त लिहिण्यासाठी शासनमान्य परवान्याची आवश्यकता असते. कोणताही दस्त शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करुन लिहावा लागतो याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, लिहिलेल्या दस्ताचा अभिलेख दरवर्षी शासनाकडे जमा करावा लागतो.

**७.** माझा शासनमान्यताप्राप्त टंकलेखनाचे प्रशिक्षण झालेले आहे. मी विक्रीदसत करण्यापूर्वी गट क्र.१०७३ चा सातबारा उतारा पाहिला होता. ७/१२ उता–यावरती सामाईक क्षेत्राचा उल्लेख असल्यास त्या सर्वांची दस्तात संमती घेणे आवश्यक असते.

**प्रश्न** – तुम्ही सन २००६ साली दस्त लिहिताना गट क्र.१०७३ च्या उता–यावरती दशरथ, एकनाथ व शेवंता यांची सामाईकात नावे होती ?

**उत्तर** – ७/१२ वरील त्यांच्या नावांना कंस करण्यात आलेला होता.

**८.** मी दशरथ, एकनाथ व शेवंता यांच्या नावाला कोणत्या फेरफार नोंदीने कंस केला होता त्याची माहिती घेतली नव्हती. मला पक्षकारांनी त्याबाबतचा उतारा दिला नव्हता. सदर गट क्र.१०७३ वरती त्यावेळी भुदरगड पतसंस्थेचा कर्जबोजा होता.

**प्रश्न** – तुम्ही दस्त लिहिण्यापूर्वी लिहून देणार एकनाथ कृष्णा घोरपडे याच्या

नावे स्वतंत्र ०.४० आर क्षेत्र असल्याचा अथवा त्याचे फिल्ड पडल्याचा उतारा पाहिला होता काय ?

**उत्तर** – गट क्र.१०७३ मध्ये एकनाथ कृष्णा घोरपडे याच्या नावे १ हेक्टर २ आर क्षेत्र असून त्यापैकी त्याने ४० आर क्षेत्राची विक्री केली होती.

९. मला एकनाथ घोरपडे याने ४० आर क्षेत्र असलेल्या चर्तुःसिमांचा कागद दिलेला नव्हता. माझ्या समक्ष त्यांच्यामध्ये कोणताही आर्थिक व्यवहार झाला नव्हता. त्यांनी मला पैसे मिळाल्याचे सांगितले होते. सन २००६ साली दस्त लिहून देणा–या व घेणा–या व्यक्तीच्या ओळखीचा पुरावा घेणे बंधनकारक नव्हते. दस्ताच्या शेवटी साक्षीदारांचे संपुर्ण नाव व पत्ते लिहिणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, दस्ताच्या शेवटी लिहून देणार व घेणार यांची संपुर्ण नावे व पत्ते लिहिणे गरजेचे असते.

१०. मी दस्त नोंदवण्यासाठी पक्षकारां सोबत गेलो नव्हतो. मी दस्तावरती पक्षकारांना तो वाचून दाखविल्यानंतर त्यांनी बरोबर असल्याचे कबूल केल्याबाबतचा शेरा लिहिलेला नाही. मी सध्या या दाव्यातील वादातील दस्तावरील साक्षीदार प्रकाश हरमळकर यांच्या मालकीच्या दुकानात व्यवसाय करत आहे. मला शासनाने आंबेओहोळ प्रकल्पामध्ये संपादित होणा–या जमिनींच्या गट क्रमांकांची यादी प्रसारीत केल्याची माहिती नाही. मी दस्त लिहिण्यापूर्वी गट क्र.१०७३ आंबेओहोळ प्रकल्पाच्या यादीत समाविष्ट आहे किंवा नाही याची खात्री केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला वादातील दस्ताची माहिती दिनकर शिवणे याने दिली होती.

११. मी सदर दस्त लिहिण्यापूर्वी दिनकर शिवणे व एकनाथ घोरपडे यांना ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनकर शिवणे यांनी कोणताही कायदेशीर कागद नसताना एकनाथ घोरपडेची फसवणूक करुन खोटा दस्त तयार करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीशी संगनमत करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.३ तर्फे उलटतपास – श्री. जी. जे. पाटील वकील.**

**१२**. प्रतिवादी क्र.३ व वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब, न्यायाच्या दृष्टीने उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**उलटतपास अपुर्ण.**

**फेर तपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०१.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.